# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(सामान्य प्रशासन शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१७/६ दिनांक: २८ ऑगस्ट २०१७

## अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक २०१७ साठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचा कार्यक्रम

या अधिसूचनेद्वारा सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(ण), २८(२)(त), २८(२)(द), २८(२)(ध), ३२(३)(छ) व ४०(२)(ग) नुसार विविध गटातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अनुक्रमे **अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळावर** सदस्य निवडून देण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १ मधील अनुच्छेद ८ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–सी/२०१७, २०–डी/२०१७, २०–ई/२०१७, २०–एफ/२०१७, २०–एच/२०१७ व २०–आय/२०१७ नुसार खालील निर्वाचक गणासाठीच्या मतदार याद्या तयार करण्याविषयीचा **निवडणूक वेळापत्रक भाग–१** विद्यापीठ निदेश क्रमांक २०–ए/२०१७ नुसार मा. कुलगुरूंचे मान्यतेने घोषित करण्यात येत आहे.

सदर मतदार याद्यांमध्ये संबंधितांचा समावेश करण्यासाठी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, विद्यापीठ परिसंस्थांचे संचालक व व्यवस्थापनाचे सचिव हयांनी पुढील वेळापत्रकानुसार **Online** प्रणालीने विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** संकेत स्थळावरील **Election 2017 Portal** वर दिलेल्या विहीत प्रपत्रात संबंधितांची नावे व इतर माहिती सादर करावी.

### निवडणूक वेळापत्रक भाग – १

| अ.क्र | विवरण | अंतीम दिनांक |
|---|---|---|
| १. | क) **खालील निर्वाचक गणांच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी मतदानासाठी पात्र असलेल्या व्यक्तींची नावे व इतर माहिती विविध प्रपत्रामध्ये (PROFORMA) Online प्रणालीने सादर करणे.**<br><br>(१) **प्राचार्य (Principal):**<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण) (Section 28(2)(o) नुसार अधिसभेवर संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे **दहा प्राचार्य** निवडून देण्याकरिता विद्यापीठ निदेश क्रमांक २०–सी/२०१७ नुसार पूर्णकालीन मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संचालकांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत समाविष्ट करण्याकरिता प्राचार्य किंवा संचालकांनी नाव व इतर माहिती **Online** प्रणालीने **PROFORMA-C** मध्ये सादर करण्याचा अंतीम दिनांक. | **बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०१७** |

| | | |
|---|---|---|
| | (२) <u>व्यवस्थापनाचे प्रतिनिधी **(Representative of Management)**</u>:<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(त) (Section 28(2)(p) नुसार अधिसभेवर संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापनाचे **सहा प्रतिनिधी** निवडून देण्याकरिता निदेश क्रमांक २०–डी/२०१७ नुसार संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधींच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत व्यवस्थापन समितीच्या प्रतिनिधींचे नाव समाविष्ट करण्यासाठी व्यवस्थापनाच्या सचिवांनी प्रतिनिधींचे नाव व इतर माहिती **Online प्रणालीने PROFORMA-D** मध्ये सादर करण्याचा **अंतीम दिनांक.** | **बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०१७** |
| | (३) <u>अध्यापक **(Teacher)**</u>:<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(द) (Section 28(2)(r) नुसार प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्याखेरीज **अधिसभेवर दहा अध्यापक** व कलम ३२(३)छ Section 32(3)(g) नुसार **विद्या परिषदेवर** प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे **दोन अध्यापक** निवडून देण्याकरिता अनुक्रमे निदेश क्रमांक २०–ई/२०१७ व २०–एच/२०१७ नुसार संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापक गणाच्या मतदार यादीत पूर्णकालीन मान्यताप्राप्त अध्यापकांची नावे समाविष्ट करण्यासाठी प्राचार्य/संचालकांनी अध्यापकांची नावे इतर माहिती **Online प्रणालीने PROFORMA-E** मध्ये सादर करण्याचा **अंतीम दिनांक.** | **बुधवार, दि. १३ सप्टेंबर, २०१७** |
| | (४) <u>विद्यापीठ अध्यापक **(University Teacher)**</u>:<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ध) (Section 28(2)(s) नुसार अधिसभेवर **तीन विद्यापीठ अध्यापक** व कलम ३२(३)छ Section 32(3)(g) नुसार **विद्या परिषदेवर** प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे **दोन अध्यापक** निवडून देण्याकरिता अनुक्रमे निदेश क्रमांक २०–एफ/२०१७ व २०–एच/२०१७ नुसार विद्यापीठाने नियुक्त केलेले विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयांचे पूर्णकालीन अध्यापक गणाच्या मतदार यादीत विद्यापीठ अध्यापकांची नावे समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, विद्यापीठ परिसंस्थांचे संचालक व विद्यापीठ संचालित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यापीठ अध्यापकांची नावे व इतर माहिती **Online प्रणालीने PROFORMA-F मध्ये** सादर करण्याचा **अंतीम दिनांक.** | **बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०१७** |

| | | |
|---|---|---|
| | (५) **महाविद्यालय व विद्यापीठ अध्यापक:**<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३२(३)(छ) (Section 32(3)(g) नुसार विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे **दोन अध्यापक** निवडून देण्याकरिता विद्यापीठ निदेश क्रमांक २०–एच/२०१७, नुसार संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे पूर्णकालीन आणि मान्यताप्राप्त अध्यापक व विद्यापीठाने नियुक्त केलेले विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयांचे पूर्णकालीन अध्यापक गणाच्या मतदार यादीत उपरोक्त क्रमांक १(क)(३) व १(क)(४) नुसार प्राप्त झालेल्या अध्यापकांच्या नावांचा समावेश करून मतदार यादी तयार करण्यात येईल. त्यामुळे या मतदार यादीसाठी स्वतंत्रपणे नावे सादर करण्याची आवश्यकता नाही.<br><br>(६) **महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील विभाग प्रमुख:**<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(ग) (Section 40(2)(c) नुसार संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील **तीन विभाग प्रमुख** अभ्यास मंडळावर निवडूण देण्याकरिता निदेश क्रमांक २०–आय/२०१७ नुसार संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील विभाग प्रमुखांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत विभाग प्रमुखांची नावे समाविष्ट करण्यासाठी प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालकांनी विभाग प्रमुखांची अभ्यास मंडळनिहाय नावे व इतर माहिती **Online** प्रणालीने **PROFORMA-G** मध्ये सादर करण्याचा **अंतीम दिनांक.**<br><br>**ख)** वरील क्रमांक १ (१ ते ६) मध्ये नमूद केलेल्या मतदारांची नावे व इतर माहिती **Online** प्रणालीने विद्यापीठ संकेत स्थळावरील **Election 2017** या पोर्टलवर सादर केल्यावर त्याची **मुद्रीत प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करून आवश्यक दस्ताऐवजाच्या साक्षांकित प्रतीसह मुद्रीत प्रत निवडणूक कक्षात सादर करण्याचा अंतीम दिनांक.** | ———<br><br>**बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०१७**<br><br>**सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** |
| २. | वर नमूद केलेल्या सर्व निर्वाचक गणांच्या तात्पुरत्या मतदार याद्या प्रसिध्द करण्याचा दिनांक. | **शुक्रवार, दि. २९ सप्टेंबर २०१७** |
| ३. | वर नमूद केलेल्या सर्व निर्वाचक गणांच्या तात्पुरत्या मतदार यादीवर कुलसचिवांकडे आक्षेप नोंदविण्याचा अंतीम दिनांक. | **मंगळवार, दि. ३ ऑक्टोंबर २०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** |
| ४. | कुलसचिवांनी आक्षेपांचे निराकरण करून सर्व दुरूस्त मतदार याद्या प्रसिध्द करण्याचा दिनांक | **शुक्रवार, दि. ६ ऑक्टोंबर २०१७** |
| ५. | कुलसचिवांनी प्रसिध्द केलेल्या सर्व दुरूस्त मतदार याद्यांवर मा. कुलगुरूंकडे आक्षेप नोंदविण्याचा अंतीम दिनांक. | **मंगळवार, दि. १० ऑक्टोंबर २०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** |
| ६. | सर्व अंतीम मतदार याद्या प्रसिध्द करण्याचा दिनांक. | **बुधवार, दि. २५ ऑक्टोंबर, २०१७** |

सूचना:

१. उपरोक्त अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १, विद्यापीठ निदेश क्रमांक २०—ए/२०१७, २०—सी/२०१७, २०—डी/२०१७, २०—ई/२०१७, २०—एफ/२०१७, २०—एच/२०१७, व २०—आय/२०१७ विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** या पोर्टलवर व विद्यापीठाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहेत.

२. वर नमूद सर्व मतदार याद्या त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या दिनांकास विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** या पोर्टलवर व विद्यापीठाच्या सूचना फलकावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.

३. सर्व अंतीम मतदार याद्यांच्या मुद्रीत प्रती संबंधीताने अर्ज केल्यावर व विद्यापीठाने विहीत केलेले शुल्क प्रदान केल्यावर विद्यापीठ प्रकाशन विभागातून उपलब्ध करून देण्यात येतील.

४. विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्व मतदार याद्या विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकतील.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव व
निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
३. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४. उपकुलसचिव, मा. कुलगुरूंचे कार्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
५. स्वीय सहायक, मा. प्र—कुलगुरूंचे कार्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
६. स्वीय सहायक, मा. कुलसचिवांचे कार्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
७. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक श्रेणी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(वसीम अहमद)
उपकुलसचिव (सा.प्र.)
(अति. कार्यभार)

NOTIFICATION-2

प्राचार्यगट


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## (सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांक: रातुमनावि/साप्र/१७/स/२५६८
दिनांक : २८ ऑगस्ट २०१७

प्रति,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित,
स्वायत्त व संचालित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व
मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

**विषय: विद्यापीठ अधिसभा निवडणूक – २०१७**
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम **२८(२)(ण)** नुसार विद्यापीठ अधिसभेवर **दहा प्राचार्य** निवडून देण्याकरिता **प्राचार्य निर्वाचक गणाची** मतदार यादी तयार करण्यासाठी नावे व इतर माहिती सादर करण्याविषयी.

**संदर्भ:** अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक २०१७ साठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचा कार्यक्रम घोषीत करणारी विद्यापीठ अधिसूचना क्र. रातुमनावि/साप्र/२०१७/निक/६, दिनांक २८ ऑगस्ट, २०१७.

**महोदय/महोदया,**

संदर्भित अधिसूचनेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम **२८(२)(ण)** (28(2)(o)) नुसार विद्यापीठाच्या **अधिसभेवर (Senate)** प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (NAAC) किंवा, यथास्थित, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाने अधिस्वीकृती दिलेल्या संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे **दहा प्राचार्य निवडून द्यावयाचे आहेत.** या निवडणूकीसाठी संलग्नित, संचालित, स्वायत्त महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे पूर्णकालीन मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालकांच्या **निर्वाचक गणाची मतदार यादी** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ मधील अनुच्छेद ८ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–सी/२०१७ नुसार तयार करावयाची आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधे कलम २(१७) (2(17)) नुसार "प्राचार्यांचा गट" याचा अर्थ जे पूर्णकालीन मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून देतील अशा पूर्णकालीन मान्यताप्राप्त प्राचार्यांनी व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संचालकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण असा आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग–४ ब, असाधारण क्रमांक १०९, दि. २९ एप्रिल, २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दि. २८ एप्रिल, २०१७ ची प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना व निदेश क्रमांक २०–सी/२०१७ नुसार अधिसभेवर प्राचार्य गटातून उमेदवारीकरिता खालील पात्रता उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे.

(क) **प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोंबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा.**

(ख) **राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा,**

(ग) **विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.**

वरील पात्रता उमेदवारीसाठी लागू असून मात्र मतदार यादीत प्राचार्यांचा नावाचा समावेश करण्यासाठी केवळ महाविद्यालयाचे मान्यताप्राप्त पूर्णकालीन प्राचार्य असणे पुरेसे आहे.

**(क. मा.पहावे)**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६४ मध्ये विद्यापीठ प्राधिकरणांचे मतदार व सदस्य होण्याकरिता नमुद करण्यात आलेल्या **अपात्रताविषयक** तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची खातरजमा मतदार यादीसाठी नाव पाठवितांना करून घेण्यात यावी.

कार्यकारी व प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव सदर मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी पाठवू नये.

**करिता वरील सर्व बाबी विचारात घेऊन प्राचार्य निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करण्याविषयी प्रसिध्द करण्यात आलेल्या संदर्भित अधिसूचनेनुसार आपले नाव व इतर माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.nagpuruniversity.org वरील Election 2017 या पोर्टलवर PROFORMA–C मध्ये Online प्रणालीने बुधवार दिनांक १३ सप्टेंबर २०१७ पर्यंत सादर करावी ही विनंती.**

तसेच **Online** प्रणालीने **Election 2017** पोर्टलवरील **PROFORMA – C** मध्ये प्राचार्यांचे नाव व इतर संबंधित माहिती सादर केल्यावर लगेच त्यांची मुद्रीत प्रत (Print) काढून, त्यावर स्वाक्षरी करून सोबत विद्यापीठ मान्यता पत्राची साक्षांकित/स्वसांक्षांकित प्रति संलग्न करून विद्यापीठातील निवडणूक कक्षात सोमवार दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ सायंकाळी ५ वाजेपर्यंत पर्यंत सादर करावी. **PROFORMA - C** ची नमुनाप्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे.

वर नमूद विद्यापीठ अधिसूचनेची प्रत, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–सी/२०१७ ची प्रत विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** पोर्टलवर उपलब्ध आहे. या दस्ताऐवजाच्या प्रती विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकतील.

विद्यापीठ निवडणूकविषयक कामाला प्राधान्य देऊन या पत्रावर सर्व प्राचार्यांनी विहीत मुदतीत कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विनीत,

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

LETTERS(RG)

**PROFORMA - 'C'**

# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

To,

**The Registrar,**
Rashtrasant Tukadoji Maharaj
Nagpur University,
**Nagpur 440 001**.

**Subject:** Submission of name and other required information for inclusion in the electoral roll of full time approved Principals and Directors of recognized institutions for election of Ten Principals to the Senate u/s 28(2)(o) of Maharashtra Public Universities Act, 2016.

**Reference:** Your letter No. ----------------------------------------, dated --------------------.

**Sir,**

I request you that my name may kindly be included in the electoral roll of full time approved Principals and Directors of recognized institutions for election of Ten Principals to the Senate u/s 28(2)(o) of Maharashtra Public Universities Act, 2016. The required information is given below:

1. Full Name (Please write in Block Letters) :

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Surname : | | | | | | | | | | | | | | | | | | |
| First Name : | | | | | | | | | | | | | | | | | | |
| Middle Name : | | | | | | | | | | | | | | | | | | |

2. Address :

3. Date of Birth : [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]
D D M M Y Y Y Y

4. Educational Qualifications :

5. Name of the College with Address :

6. Date of joining: [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]
D D M M Y Y Y Y

7. University approval letter No. and date :

8. Mobile No.:

9. E-mail Id :

I, hereby certify that, I have not incurred any of the disqualification mentioned u/s 64 of the Maharashtra Public Universities Act, 2016.

I, hereby declare that, the information furnished in this Proforma is true and correct to the best of my knowledge and belief. In case any information given by me is found to be incorrect or false, my request shall be liable to be rejected.

**Enclosure:** Attested or Self Attested copy of University approval letter.
**(Required Document)**

Place :
Date :

Yours faithfully

(Signature of the Principal/Director
with seal of the College/Institute)

Note: After submitting online soft copy of this form to the University, please take out the print of this form and submit the same, duly signed and putting the seal of the College below the signature, to the University alongwith the required documents on or before the last date mentioned in the letter cited above under reference.

LETTERS (RG)

**व्यवस्थापन प्रतिनिधीगट**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## (सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्रमांक: रातुमनावि/साप्र/१७/स/२५६९
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१७

प्रति,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित,
स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्थांच्या व्यवस्थापनाचे
सर्व अध्यक्ष/सचिव.

**विषय: विद्यापीठ अधिसभा निवडणूक – २०१७**
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम **२८(२)(त)** (28(2)(p)) नुसार विद्यापीठ **अधिसभेवर व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी** (Management Representative) निवडून देण्याकरिता व्यवस्थापन समिती प्रतिनिधी निर्वाचक गणाची **मतदार यादी** तयार करण्यासाठी नावे व इतर माहिती सादर करण्याविषयी.

**संदर्भ:** अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक २०१७ साठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचा कार्यक्रम घोषीत करणारी विद्यापीठ अधिसूचना क्र. रातुमनावि/साप्र/२०१७/निक/६, दिनांक २८ ऑगस्ट, २०१७.

महोदय/महोदया,

संदर्भित अधिसूचनेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(त) (Section 28(2)(p) नुसार **अधिसभेवर (Senate)** संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापनाचे **सहा प्रतिनिधी** निवडून देण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ मधील अनुच्छेद ८ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–डी/२०१७ नुसार संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या प्रतिनिधी निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करावयाची आहे.

परंतु जेथे व्यवस्थापन, एक व त्याहून अधिक महाविद्यालये किंवा परिसंस्था चालवित असेल त्याबाबतीत, अशा व्यवस्थापनाचा केवळ **एक प्रतिनिधी** हा व्यवस्थापन प्रतिनिधी गटाच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत समाविष्ट होण्याकरिता पात्र असेल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधे कलम २(१६) (2(16)) नुसार "व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट" याचा अर्थ जे संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचें प्रतिनिधी आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणंचे सदस्य म्हणून निवडून देतील अशा, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या प्रतिनिधींचा मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग–४ ब, असाधारण क्रमांक १०९, दि. २९ एप्रिल, २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दि. २८ एप्रिल, २०१७ ची प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना व निदेश क्रमांक २०–डी/२०१७ नुसार अधिसभेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून उमेदवारीककरता खालील पात्रता उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे.

(क) स्नातक पदवी धारण केलेला असावा,

(ख) व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्ष सदस्य असावा,

(ग) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.

(कृ.मा. पहावे)

वरील पात्रता उमेदवारीसाठी लागू असून, मतदार यादीत व्यवस्थापन प्रतिनिधींच्या नावांचा समावेश करण्यासाठी केवळ व्यवस्थापनाचा अधिकृत प्रतिनिधी असणे पुरेसे आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६४ मध्ये विद्यापीठ प्राधिकरणांचे मतदार व सदस्य होण्याकरिता नमुद करण्यात आलेल्या **अपात्रताविषयक** तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची खातरजमा मतदार यादीसाठी नाव पाठवितांना करून घेण्यात यावी.

करिता वरील सर्व बाबी विचारात घेऊन व्यवस्थापन समितीच्या प्रतिनिधींच्या निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करण्याविषयी प्रसिध्द करण्यात आलेल्या संदर्भित विद्यापीठ अधिसूचनेनुसार आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या प्रतिनिधींचे नाव व इतर माहिती विद्यापीठ संकेतस्थळ **www.nagpuruniversity.org** वरील **Election 2017** या पोर्टलवर **PROFORMA - D** मध्ये **Online** प्रणालीने **बुधवार, दि. १३ सप्टेंबर,** २०१७ पर्यंत आपण सादर करावी, ही विनंती.

तसेच **Online** प्रणालीने **Election 2017** पोर्टलवरील **PROFORMA - D** मध्ये व्यवस्थापन समिती प्रतिनिधींचे नाव व इतर संबंधित माहिती सादर केल्यावर लगेच त्याची मुद्रीत प्रत (Print) काढून, त्यावर स्वाक्षरी करून सोबत व्यवस्थापन समितीने प्रतिनिधी नामित करण्यासाठी पारित केलेला ठराव व शिक्षण संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांची साक्षांकित/ स्वसांक्षांकित यादी संलग्न करून विद्यापीठातील निवडणूक कक्षात **सोमवार, दि. १८ सप्टेंबर, २०१७ सायंकाळी ५ वाजेपर्यंत** सादर करावी. **PROFORMA - D** ची नमुनाप्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे.

वर नमूद विद्यापीठ अधिसूचनेची प्रत, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–डी/२०१७ ची प्रत विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** पोर्टलवर उपलब्ध आहे. या दस्ताऐवजाच्या प्रती विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकतील.

विद्यापीठ निवडणूकविषयक कामाला प्राधान्य देऊन या पत्रावर सर्व व्यवस्थापनाचे अध्यक्ष/सचिव यांनी कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विनीत,

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

LETTERS(RG)

**PROFORMA - 'D'**

## RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

To,

**The Registrar,**
Rashtrasant Tukadoji Maharaj
Nagpur University,
**Nagpur 440 001**.

**Subject:** Submission of name and other required information for inclusion in the electoral roll of Management Representatives for election of Six Representatives of Management to the Senate u/s 28(2)(p) of Maharashtra Public Universities Act, 2016.

**Reference:** Your letter No. ----------------------------------------, dated --------------------.

**Sir,**

I request you that the name of the following representatives of our College Management may kindly be included in the electoral roll of Management Representatives for election of Six Representatives of Management to the Senate u/s 28(2)(p) of Maharashtra Public Universities Act, 2016. The required information is given below:

1. Full Name (Please write in Block Letters) :

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Surname : | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| First Name : | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| Middle Name : | | | | | | | | | | | | | | | | | | | |

2. Address :

3. Date of Birth :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| D | D | M | M | Y | Y | Y | Y |

4. Educational Qualifications :

5. Mobile No.:

6. E-mail Id :

7. Designation, if any :

8. Name of the College Management with Address:

9. Name(s) of affiliated/autonomous College(s):

I am enclosing herewith the Resolution of the Management signed by both the President and Secretary and list of the colleges run by the management.

I, hereby certify that due care has been taken to ensure that the above mentioned representative of the Management has not incurred any of the disqualifications mentioned u/s 64 of the Maharashtra Public Universities Act, 2016.

I, hereby declare that, the information furnished in this Proforma is true and correct to the best of my knowledge and belief. In case any information given by me is found to be incorrect or false, my request shall be liable to be rejected.

**Enclosure**: 1. Resolution of the Management signed by both the President and Secretary.
**(Required Document)** 2. List of colleges run by the management.

Yours faithfully,

Place : __________
Date : __________

(Signature of the President/Secretary with seal of the College Management)

Note: After submitting online soft copy of this proforma to the University, please take out the print of this Proforma and submit the same, duly signed and putting the seal of the College Management below the signature, to the University alongwith the required documents on or before the last date mentioned in the letter cited above under reference.

LETTERS (RG)

**महाविद्यालय अध्यापकगट**


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(सामान्य प्रशासन शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांक: रातुमनावि/साप्र/१७/स/२५७०
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१७

प्रति,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित,
स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्थांचे सर्व प्राचार्य/संचालक.

**विषय: विद्यापीठ अधिसभा व विद्या परिषद निवडणूक – २०१७**
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम **२८(२)(द)** (28(2)(r)) नुसार विद्यापीठ अधिसभेवर **(Senate) दहा** व कलम ३२(३)(छ) Section 32(3)(g) नुसार विद्या परिषदेवर प्रत्येक विद्या शाखेचे प्रतिनिधीत्व करणारे **दोन** अध्यापक निवडून देण्याकरिता संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापक निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करण्यासाठी नावे व इतर माहिती सादर करण्याविषयी.

**संदर्भ:** अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक २०१७ साठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचा कार्यक्रम घोषीत करणारी विद्यापीठ अधिसूचना क्र. रातुमनावि/साप्र/२०१७/निक/६, दिनांक २८ ऑगस्ट २०१७.

**महोदय/महोदया,**

संदर्भित अधिसूचनेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(द) (28(2)(r)) नुसार विद्यापीठ **अधिसभेवर (Senate) दहा** व कलम ३२(३)(छ) Section 32(3)(g) नुसार **विद्या परिषदेवर** प्रत्येक विद्या शाखेचे प्रतिनिधीत्व करणारे **दोन** अध्यापक निवडून देण्याकरिता संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापक निर्वाचक गणाची मतदार यादी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ मधील अनुच्छेद ८ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–ई/२०१७ व २०–एच/२०१७ नुसार तयार करावयाची आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधे कलम २(१८) (2(18)) नुसार "अध्यापकांचा गट" याचा अर्थ जे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून देतील अशा, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण असा आहे.

विद्यापीठ निदेश क्रमांक २०–एच/२०१७ मधील अनुच्छेद ५(डी) नुसार, "Collegium of University and College Teachers" means an electoral college consisting of full-time Teachers from University Departments, University Institutions and conducted Colleges appointed by the University and fulltime approved Teachers from affiliated, autonomous colleges and recognized institutions, who shall elect from amongst themselves as members to the Academic Council.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग–४ ब, असाधारण क्रमांक १०९, दि. २९ एप्रिल, २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दि. २८ एप्रिल, २०१७ ची प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना व निदेश क्रमांक २०–ई/२०१७ नुसार अधिसभेवर अध्यापक गटातून उमेदवारीसाठी खालील पात्रता उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे.

(क) **पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा, किंवा एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा.**

(ख) **विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.**

(कृ.मा.पहावे)

आणि विद्या परिषदेवर अध्यापक गटातून उमेदवारीसाठी निदेश क्रमांक २०–एच/२०१७ नुसार खालील पात्रता उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे.

(क) **पीएच.डी. पदवीधारक असावा,**

(ख) **एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,**

(ग) **मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असेल ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल,**

(घ) **किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत,**

(ङ) **विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.**

वरील पात्रता उमेदवारीसाठी लागू असून मतदार यादीत अध्यापकांच्या नावांचा समावेश करण्यासाठी केवळ महाविद्यालय/परिसंस्थेचे मान्यताप्राप्त पूर्णकालीन अध्यापक असणे पुरेसे आहे.

अंशदानात्मक शिक्षक (Contributory Teachers) व करारावरील शिक्षक (Contract Basis Teachers) ह्यांची नावे पाठवू नयेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६४ मध्ये विद्यापीठ प्राधिकरणांचे मतदार व सदस्य होण्याकरिता नमुद करण्यात आलेल्या **अपात्रताविषयक** तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची खातरजमा मतदार यादीसाठी नाव पाठवितांना करून घेण्यात यावी.

करिता वरील सर्व बाबी विचारात घेऊन अध्यापक निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करण्याविषयी प्रसिध्द करण्यात आलेल्या संदर्भित विद्यापीठ अधिसूचनेनुसार आपल्या महाविद्यालय /परिसंस्थेतील अध्यापकांची नावे व इतर माहिती विद्यापीठ संकेतस्थळ **www.nagpuruniversity.org** वरील **Election 2017** या पोर्टलवर **PROFORMA - E** मध्ये **Online** प्रणालीने **बुधवार, दि. १३ सप्टेंबर, २०१७ पर्यंत** आपण सादर करावी, ही विनंती.

तसेच **Online** प्रणालीने **Election 2017** पोर्टलवरील **PROFORMA - E** मध्ये अध्यापकांची नावे व इतर संबंधित माहिती सादर केल्यावर लगेच त्याची मुद्रीत प्रत (Print) काढून, त्यावर स्वाक्षरी करून विद्यापीठातील निवडणूक कक्षात **सोमवार, दि. १८ सप्टेंबर, २०१७ सायंकाळी ५ वाजेपर्यंत** सादर करावी. **PROFORMA-E** ची नमुनाप्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे. तसेच सदर माहितीची एक प्रत संबंधीत शिक्षकांच्या माहितीकरिता महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

वर नमूद विद्यापीठ अधिसूचनेची प्रत, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–ई/२०१७ व २०–एच/२०१७ ची प्रत विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** पोर्टलवर उपलब्ध आहे. या दस्ताऐवजाच्या प्रती विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकतील.

विद्यापीठ निवडणूकविषयक कामाला प्राधान्य देऊन या पत्रावर सर्व प्राचार्य/संचालकांनी कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विनीत,

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

LETTERS(RG)

**PROFORMA – E**

# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

**Information relating to the teachers of the affiliated, autonomous colleges and recognised institutions for the preparation of Electoral Rolls for the election of Ten Teachers to the Senate u/s 28(2)(r) and Two Teachers representing each Faculty of University to the Academic Council u/s 32(3)(g) of Maharashtra Public Universities Act, 2016.**

**Name of the Institution/College** ____________________

| Sr.No. | Full Name of the Teachers (Surname first) in Block Letters | Subject | Faculty | Educational Qualifications | Date of Joining | Date of approval by University | Address, Mobile No. and E-mail address | Remark, if any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | | 7. | 8. |
| | | | | | | | | |

**I, hereby certify that due care has been taken to ensure that the above mentioned Teachers have not incurred any of the disqualifications mentioned u/s 64 of the Maharashtra Public Universities Act, 2016.**

**I, hereby further certify that all the information filled in this Proforma is true and correct as per my knowledge and office record.**

**Place:** ____________

**Date:** ____________

**Signature and Seal of the Head of the Department/Principal**

**Name :** ____________________

**Note:** After submitting online soft copy of this from to the University please take out the print of this form and submit the same duly signed to the Election Cell of the University on or before the last date mentioned in the notification.

**Landscape Proforma**

महाविद्यालय विभाग प्रमुखगट

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## (सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९११ फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्रमांक: रातुमनावि/साप्र/१७/स/२५७२
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१७

प्रति,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे सर्व संचालक.

**विषय:** विद्यापीठ अभ्यास मंडळ निवडणूक – २०१७
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४०(२)(ग) (40(2)(c)) नुसार विद्यापीठ अभ्यास मंडळांवर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभाग प्रमुखांना निवडून देण्याकरिता विभाग प्रमुख निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करण्यासाठी विभाग प्रमुखांची नावे व इतर माहिती सादर करण्याविषयी.

**संदर्भ:** अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक २०१७ साठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचा कार्यक्रम घोषीत करणारी विद्यापीठ अधिसूचना क्र. रातुमनावि/साप्र/२०१७/निक/६, दिनांक २८ ऑगस्ट २०१७.

महोदय/महोदया,

संदर्भित अधिसूचनेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(ग) (40(2)(c)) मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभाग प्रमुखांच्या निर्वाचक गणाद्वारे त्यांच्या मधून विद्यापीठ निदेश क्र. १७/२०१७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अभ्यास मंडळांवर प्रत्येकी **तीन विभाग प्रमुखांची** निवड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १ मधील अनुच्छेद ८ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–आय/२०१७ नुसार महाविद्यालयातील विभाग प्रमुख निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करावयाची आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधे कलम २(१४) (2(14)) नुसार "संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा गट" याचा अर्थ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा, जे संबंधीत प्राधिकरणांचे सदस्य म्हणून त्यांच्यामधून निवडून देतील, त्यांचा समावेश असलेला निर्वाचक गण असा आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग–४ ब, असाधारण क्रमांक १०९, दि. २९ एप्रिल, २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दि. २८ एप्रिल, २०१७ ची प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(८) नुसार निर्गमित केलेल्या निदेश क्रमांक २०–आय/२०१७ नुसार विभाग प्रमुखांच्या गटातून उमेदवारीकरिता खालील पात्रता उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे.

(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोंबर, २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,
(ख) पदवीपुर्वस्तरावर एकूण किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा,
(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज किमान एकूण पाच वर्ष केलेले असावे.

वरील पात्रता उमेदवारीसाठी लागू असून मतदार यादीत विभाग प्रमुखांच्या नावांचा समावेश करण्यासाठी केवळ महाविद्यालयात संबंधीत विषयाचे विभाग प्रमुख असणे पुरेसे आहे.

(कृ.मा.पहावे)

अंशदानात्मक शिक्षक (Contributory Teachers) व करारावरील शिक्षक (Contract Basis Teachers) हयांची नावे पाठवू नयेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६४ मध्ये विद्यापीठ प्राधिकरणांचे मतदार व सदस्य होण्याकरिता नमुद करण्यात आलेल्या **अपात्रताविषयक** तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची खातरजमा मतदार यादीसाठी नाव पाठवितांना करून घेण्यात यावी.

महाविद्यालयातील **ग्रंथपाल** यांची नावे **ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग प्रमुख** आणि शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक सोडून **इतर महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण संचालक** यांची नावे **शारिरीक शिक्षण विभाग प्रमुख** म्हणून पाठवू नयेत.

**करिता वरील बाबी विचारात घेऊन अभ्यास मंडळ निवडणुकीसाठी विभाग प्रमुख निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करण्याविषयी प्रसिध्द करण्यात आलेल्या विद्यापीठ अधिसूचनेनुसार आपल्या महाविद्यालयातील विषयनिहाय, अभ्यासमंडळनिहाय व विद्याशाखानिहाय विभाग प्रमुखांची नावे व इतर माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.nagpuruniversity.org वरील Election 2017 या पोर्टलवर PROFORMA – G मध्ये Online प्रणालीने बुधवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ पर्यंत आपण सादर करावी, ही विनंती.**

तसेच **Online** प्रणालीने **Election 2017** पोर्टलवरील **PROFORMA – G** मध्ये विभाग प्रमुखांची नावे व इतर संबंधित माहिती सादर केल्यावर लगेच त्याची मुद्रीत प्रत (Print) काढून, त्यावर स्वाक्षरी करून विद्यापीठातील निवडणूक कक्षात सोमवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ पर्यंत सादर करावी. तसेच सदर माहितीची एक प्रत संबंधीत शिक्षकांच्या माहितीकरिता महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात यावी. **PROFORMA-G** ची नमुनाप्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे.

सादर करावयाच्या माहितीच्या लिफाफयावर **अभ्यास मंडळ निवडणूक – २०१७** असे नमूद करावे. विहीत मुदतीत आपणाकडून विभाग प्रमुखांची नावे सादर करण्याअभावी अभ्यास मंडळाच्या मतदार यादीत आपल्या महाविद्यालयातील विभाग प्रमुखांची नावे समाविष्ट न झाल्यास, त्याची जबाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

वर नमूद विद्यापीठ अधिसूचनेची प्रत, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १, विद्यापीठ निदेश क्रमांक १७/२०१७ व विद्यापीठ निदेश क्रमांक २०–आय/२०१७ ची प्रत व विद्याशाखानिहाय अभ्यास मंडळे व त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या विषयांची सूची संकेतांसह (कोड नंबर) विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election - 2017** वर उपलब्ध आहे. या दस्ताऐवजाच्या प्रती विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकतील.

विद्यापीठ निवडणूकविषयक कामाला प्राधान्य देऊन या पत्रावर सर्व प्राचार्य/संचालकांनी कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विनीत,

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

LETTERS(RG)

**PROFORMA – G**

# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

**Names of the Heads of the Department for Electoral College consisting of Heads of Departments in Affiliated Colleges and Recognised Institutions for Election to Board of Studies u/s 40(2)(c) of the Maharashtra Public Universities Act, 2016.**

NAME OF COLLEGE: -------------------------------------------------- TELEPHONE NO. OF THE COLLEGE: --------------------

ADDRESS OF THE COLLEGE: -------------------------------------------------- MOBILE NO. OF THE PRINCIPAL --------------------

EMAIL ID OF THE COLLEGE PRINCIPAL: --------------------------------------------------

| Sr. No | Full Name of the Head of the Department (Surname First) | FACULTY | | BOARD OF STUDIES | | SUBJECT | | Date of Appoint-ment as a Teacher in the College | Total Length of Service as approved Teacher in the College | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Code | Name | Code | Name of Board | Code | Name | | Year | Month | |
| | | | | | | | | | | | |

**I, hereby certify that due care has been taken to ensure that the above mentioned Teachers have not incurred any of the disqualifications mentioned u/s 64 of the Maharashtra Public Universities Act, 2016.**

**I, hereby further certify that all the information filled in this Proforma is true and correct as per my knowledge and office record.**

**Date:** ---------------

**Place:** --------------

**(Name & Signature of the Principal with seal)**

**Note:** After submitting online soft copy of this from to the University please take out the print of this form and submit the same duly signed to the Election Cell of the University on or before the last date mentioned in the notification.

**Landscape Proforma**